आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात
E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष १० वे ● अंक २४४ वा ● बुधवार १७ जून २०२६ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणासाठी पुणे-मुंबई लॉन्ग मार्च; २४ जून रोजी आझाद मैदानावर भव्य मोर्चा !

लातूर, प्रतिनिधी : अनुसूचित जातीतील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळावा तसेच सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण लागू करण्यात यावे आणि सामाजिक न्याय व सलोखा कायम राखावा, या प्रमुख मागण्यांसाठी अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने पुणे ते मुंबई असा लॉन्ग मार्च आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती संघटनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.




पुणे येथील आद्य क्रांतिगुरू देशपिता लहुजी बाबा साळवे यांच्या समाधीस्थळापासून १७ जून रोजी या लॉन्ग मार्चला प्रारंभ होणार असून २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे भव्य मोर्चा व आंदोलनाने त्याची सांगता होणार आहे.

या आंदोलनाला होल्हार, बुरूड, मेहतर, भंगी, हिंदू खाटीक, कैकाडी, चांभार, ढोर, मोची आदी उपेक्षित जातींसह विविध सामाजिक संघटना व संघटनांचा पाठिंबा मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीमाई साठे, नातू सचिनभाऊ साठे, गणेशभाऊ भगत, अण्णाभाऊ साठे यांचे नाती व नातजावई, ॲड. टी. एन. कांबळे आणि राज क्षीरसागर हे करणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी राज क्षीरसागर यांनी लातूर जिल्ह्यातील कार्यकर्ते, समाजबांधव आणि नागरिकांनी २४ जून रोजी मुंबईच्या आझाद मैदान येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला बळ द्यावे, असे आवाहन केले.

पत्रकार परिषदेला राज क्षीरसागर, ॲड. टी. एन. कांबळे, सुरेश चव्हाण, आनंद वैरागे, डी. एल. वाघमारे, सचिंद्र कांबळे, किशोर शिंदे, पिराजी साठे, अशोक गायकवाड, नेताजी मस्के, राहुल क्षीरसागर, विजय गव्हणे, राहुल घोलप, अर्जुन बावरी, नारायण जोगदंड, सुनील जोगदंड, आकाश लोंढे, सूरज लोंढे, श्रीधर आवळे, मुकेशबली क्षीरसागर, अतिश पाटोळे, सचिन कांबळे, अनिकेत गायकवाड, अजय गोटमुखले, बली कांबळे, भुजंग अर्जुने, आकाश शिंदे, दत्ता साळुंखे, मनीष हजारे, लहुजी शिंदे, नेताजी कांबळे, मुकेश पवार, अविनाश कांबळे, रितेश कांबळे, करण कदम, मंगेश जोगदंड, विशाल पवार, रघु काळे, विशाल काळे, ईश्र्वर काळे, मंगेश तुरे आदी उपस्थित होते.

## विधान परिषद निवडणुकीनिमित्त लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद

लातूर, दि. १६ (जिमाका): उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे आदेश जारी केले आहेत.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ (सी) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये देण्यात आलेल्या या आदेशानुसार, मंगळवार, १६ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपासून पुढे मद्य विक्री बंद राहील. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवार, १७ जून २०२६ रोजी संपूर्ण दिवस, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हा आदेश लातूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी होत असलेल्या सर्व संबंधित क्षेत्रांना लागू राहणार आहे. यामध्ये लातूर महानगरपालिका हद्दीसह रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकूर, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, औसा आणि निलंगा या सर्व नगर पंचायत हद्दींचा समावेश आहे. या सर्व नमूद क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व देशी आणि विदेशी मद्याची घाऊक व किरकोळ विक्री, तसेच ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ क्लब अनुज्ञप्ती, सीएल-२, सीएल-३, टिओडी-३, टिडी-१ इत्यादी सर्व प्रकारची दुकाने) या आदेशित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील.

सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## एसटी महामंडळाच्या लातूर विभागात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

लातूर, दि. १६ (जिमाका): महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण व्हावे, या उद्देशाने एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या अनुषंगाने लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार लातूर विभागातील या उपक्रमाची सुरुवात १७ जून २०२६ रोजी औसा आगारातून होणार असून, त्यानंतर २४ जून रोजी उदगीर, १ जुलै रोजी निलंगा, ८ जुलै रोजी अहमदपूर आणि २२ जुलै २०२६ रोजी लातूर आगार येथे या विशेष मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे.

या जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक संबंधित आगारात एकाच दिवशी दोन सत्रांत हा उपक्रम राबविला जाणार असून, पहिल्या सत्रात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत 'प्रवासी राजा दिन' आयोजित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवासी, विविध प्रवासी संघटना, तसेच शाळा व महाविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी होऊन आपल्या बस सेवेसंबंधीच्या अडीअडचणी, तक्रारी आणि सुधारणांसाठीच्या सूचना लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतील. प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत 'कामगार पालक दिन' राबविण्यात येणार असून, यामध्ये एसटी कर्मचारी आणि कामगार संघटनांचे प्रश्न ऐकून घेत कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रश्न, रजा मंजुरी, कर्तव्याचे वेळापत्रक आणि प्रशासकीय कारवाई यांसारख्या तक्रारी व अडीअडचणींचे तात्काळ निराकरण केले जाणार आहे.

## इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या सीएसआर उपक्रमातून सायन रुग्णालयाला अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १६ : सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर)उपक्रमांतर्गत मुंबईतील लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय (सायन रुग्णालय) येथे अत्याधुनिक, पूर्णपणे स्वयंचलित बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अत्याधुनिक यंत्रणेमुळे रुग्णांना जलद आणि अचूक निदान सेवा मिळणार असून उपचार प्रक्रियेलाही गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आरोग्य क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. इंडियन ऑइलसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी सीएसआर माध्यमातून आरोग्य सेवेसाठी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. सायन रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात आलेल्या या अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझरमुळे निदान प्रक्रिया अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक होईल. त्यामुळे डॉक्टरांना उपचारासंदर्भात तातडीने निर्णय घेणे शक्य होईल आणि रुग्णांना त्याचा थेट लाभ मिळेल. लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय हे मुंबईसह राज्यातील विविध भागांतील हजारो रुग्णांना आरोग्य सेवा पुरविणारे महत्त्वाचे वैद्यकीय केंद्र आहे. दररोज मोठ्या प्रमाणावर रक्त तपासण्या करण्यात येत असल्याने प्रयोगशाळेवरील ताण वाढत असतो.

नव्याने उपलब्ध झालेल्या या उच्च क्षमतेच्या पूर्ण स्वयंचलित बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझरमुळे तपासणी अहवाल देण्याचा कालावधी लक्षणीयरित्या कमी होणार आहे.ही अत्याधुनिक यंत्रणा मोठ्या प्रमाणात नमुन्यांची जलद प्रक्रिया करण्यास सक्षम असून त्यातून अधिक अचूक व विश्र्वासार्ह अहवाल उपलब्ध होणार आहेत. यामुळे रुग्णांच्या निदान प्रक्रियेला गती मिळून उपचार तातडीने सुरू करणे शक्य होईल. विशेषतः आपत्कालीन परिस्थितीतील रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध कॉर्पोरेट संस्थांमधील सहकार्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे समाजातील वंचित व गरजू घटकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. सायन रुग्णालयात उपलब्ध झालेल्या या आधुनिक वैद्यकीय उपकरणामुळे प्रयोगशाळेची कार्यक्षमता वाढण्याबरोबरच रुग्णांचा प्रतीक्षाकाल कमी होऊन आरोग्य सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यास मदत होणार आहे.

## लातूर जिल्ह्यातील 'नीट' परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर, दि. १६ (जिमाका): राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत रविवार, २१ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील एकूण २६ उपकेंद्रांवर 'नीट युजी' परीक्षा पार पडणार आहे. ही परीक्षा पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

परीक्षेच्या दिवशी प्रश्र्नपत्रिकांची बेकायदेशीर छपाई किंवा इतर गैरप्रकार टाळण्याच्या उद्देशाने परीक्षा केंद्राच्या १०० किंवा आवश्यकतेनुसार २०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदरपासून ते परीक्षा संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश या आदेशात देण्यात आले आहेत. तसेच, परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी वगळता पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास आणि शांतता भंग होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. याव्यतिरिक्त, परीक्षा केंद्राच्या आवारात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे सोबत बाळगून प्रवेश करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

प्रतिबंधात्मक आदेश हे परीक्षेच्या कामकाजासाठी व निगराणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांना त्यांच्या कर्तव्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. मात्र, ही परीक्षा अत्यंत सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील इतर सर्व नागरिकांनी या प्रतिबंधात्मक आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाच्या विकासकामांना वेग देण्यावर भर - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई, दि. १६ : राज्यातील मत्स्यव्यवसाय व बंदरे



विभागाशी संबंधित विविध प्रकल्प, धोरणे आणि पायाभूत सुविधांच्या कामांचा आढावा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात आयोजित बैठकीत घेण्यात आला.

बैठकीत शिवनीबांध मत्स्य बीज केंद्र भाडेपट्टीने देण्याचा प्रस्ताव, मोर्शी (जि. अमरावती) येथील मत्स्यव्यवसाय व जलशेती पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प, उजनी धरणात मत्स्यबीज सोडण्यासाठी प्लुटस सर्व्हिसेस या ठेकेदारास मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव तसेच शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र, धोम (ता. वाई, जि. सातारा) हे व्हीआरपी फिशरी प्रायव्हेट लिमिटेड यांना भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

शाश्र्वत विकास ध्येये अंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित निर्देशकांमध्ये सुधारणा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, ससून डॉक सामंजस्य करारानंतरची कार्यवाही, मरोळ मच्छिमार मार्केट विकासाचा प्रगती अहवाल तसेच मच्छिमार महिलांसाठी हँडग्लोज व गमबूट उपलब्ध करून देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्र सागरी मंडळ (जाहिरातींच्या प्रदर्शनाचे विनियमन) विनियम, २०२६ तसेच स्टॉल व जमीन भाडेपट्ट्याने देण्यासंबंधीच्या विनियमांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्यात आली. मुंबई वॉटर मेट्रोसाठी पीएमसी नियुक्तीची सद्यस्थिती, वर्सोवा जेट्टीच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील इतर प्रवासी जेट्टींवरील सुविधा सुधारणा, विजयदुर्ग व जयगड येथे प्रस्तावित शिपयार्ड प्रकल्प, मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी जलवाहतुकीसाठी ऑनलाइन तिकीट वितरण प्रणाली तसेच 'लँड मॅनेजमेंट अँड वॉटरफ्रंट यूज पॉलिसी' याबाबतही सविस्तर चर्चा झाली.

मंत्री नितेश राणे यांनी सर्व विषयांचा सविस्तर आढावा घेत कामांची सद्यस्थिती तपासली. प्रलंबित कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने करण्यात यावी तसेच विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक वेग देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप,महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेण्यासाठी विधि व न्याय विभागाचे मार्गदर्शन घ्यावे - आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

मुंबई, दि. १६ : आदिवासी विकास विभागांतर्गत आश्रमशाळांमध्ये तासिका/रोजंदारी तत्त्वावर कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासंदर्भात विविध न्यायालयीन प्रकरणे, न्यायालयाचे वेगवेगळे आदेश आदींचा अभ्यास करून विधि व न्याय विभागाचे कायदेशीर मार्गदर्शन प्राधान्याने घेण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

मंत्री डॉ. वुईके यांनी याविषयासंदर्भात शासकीय निवासस्थानी बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. आदिवासी विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. कर्मचारी प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तासिका व रोजंदारी तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यासंदर्भातील न्यायालयीन आदेश, शासन निर्णय आणि विविध प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये तासिका व रोजंदारी तत्त्वावर कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रतिकूल परिस्थितीत आणि प्रतिकूल ठिकाणी सेवा देत आहेत. त्यांच्या मागण्या एवढ्या वर्षांपासून प्रलंबित ठेवणे संयुक्तिक नसून, याकडे सहानुभूतीपूर्वक पाहण्याची गरज आहे. ह प्रकरण आणखी प्रलंबित न ठेवता, त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत विधि व न्याय विभागाचे कायदेशीर मार्गदर्शन घेऊन हा मुद्दा निकाली काढावा.

मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांमध्ये कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी विविध रिट याचिका दाखल केल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाला निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात शासनाने यापूर्वीही विशेष बाब म्हणून पात्र कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाबाबत निर्णय घेतला आहे. बैठकीत न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांवर सर्व प्रकरणांचा कायदेशीर आणि मानवीय दृष्टीकोनातून विचार करावा. न्यायालयीन आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करताना पात्र कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, तसेच शासनाच्या नियमांचेही पालन व्हावे, याची खबरदारी बाळगण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, आदिवासी भागातील शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता टिकवून ठेवणे आणि दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. न्यायालयीन आदेशांचे पालन करताना कोणत्याही पात्र कर्मचाऱ्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सर्व प्रकरणे निर्धारित कालावधीत निकाली काढण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# राज्य उत्पादन शुल्क : दशा आणि दिशा !

## संपादकीय...

राज्याच्या महसूल उत्पन्नात उत्पादन शुल्क विभागाचे महत्त्वाचे स्थान आहे. मद्यनिर्मिती, विक्री आणि वितरण यांवर नियंत्रण ठेवून हा विभाग महसूल गोळा करतो. राज्याच्या आर्थिक विकासासाठी हा महसूल मोठा आधार ठरतो. वाढत्या खर्चाच्या पार्श्र्वभूमीवर उत्पादन शुल्काचे महत्त्व अधिक वाढले आहे. उत्पादन शुल्क विभाग केवळ कर वसुलीचे काम करत नाही. तो अवैध मद्यनिर्मिती आणि तस्करीवर नियंत्रण ठेवतो. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे हीदेखील त्याची जबाबदारी आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होते.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये उत्पादन शुल्कातून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. हा निधी विकासकामांसाठी वापरला जातो. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक योजनांना याचा लाभ होतो. म्हणून उत्पादन शुल्क विभाग राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. तथापि, या विभागासमोर अनेक आव्हाने आहेत. अवैध मद्यनिर्मिती हा गंभीर प्रश्र्न आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांत बेकायदेशीर दारूचे जाळे आढळते. यामुळे शासनाचा महसूल बुडतो. तसेच नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

बनावट मद्यामुळे अनेकदा जीवितहानीच्या घटना घडतात. या घटनांमुळे प्रशासनावर प्रश्र्नचिन्ह निर्माण होते. तस्करीमुळेही मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. शेजारील राज्यांतून अवैध मार्गाने मद्य आणले जाते. यावर नियंत्रणासाठी अधिक दक्षता आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर अद्याप अपेक्षित प्रमाणात झालेला नाही. अनेक प्रक्रिया अजूनही पारंपरिक पद्धतीने चालतात. यामुळे कार्यक्षमतेवर परिणाम होतो. पारदर्शकता वाढविण्याची गरज आहे.

भ्रष्टाचाराचे आरोपही काहीवेळा समोर येतात. परवाने, तपासणी आणि कारवाई प्रक्रियेत पारदर्शकता आवश्यक आहे. जनतेचा विश्र्वास टिकवणे हे प्रशासनासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी जबाबदारीची भावना वाढवावी लागेल. उत्पादन शुल्क विभागाच्या दिशेबाबत विचार करणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणे ही काळाची गरज आहे. ऑनलाइन परवाना प्रणाली अधिक सक्षम करावी. ई–गव्हर्नन्समुळे पारदर्शकता वाढेल. वेळ आणि खर्चाची बचत होईल.

मद्य उत्पादन आणि विक्रीचे प्रभावी ट्रॅकिंग करणे गरजेचे आहे. बारकोड आणि क्यूआर कोड प्रणालीचा विस्तार करावा. यामुळे बनावट उत्पादनांवर नियंत्रण मिळवता येईल. महसूल गळती कमी होईल. अवैध मद्यविरोधी मोहिमा अधिक प्रभावी कराव्यात. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय वाढवावा. जनजागृती कार्यक्रम राबविणेही आवश्यक आहे. नागरिकांचा सहभाग वाढल्यास नियंत्रण अधिक प्रभावी होईल.

अधिकाऱ्यांना नियमित प्रशिक्षण दिले पाहिजे. आधुनिक तपास पद्धतींची माहिती उपलब्ध करून द्यावी. तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य विकसित करावे. यामुळे विभागाची कार्यक्षमता वाढेल. महसूल वाढविण्यासोबत सामाजिक जबाबदारीही महत्त्वाची आहे. मद्यपानाच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करावी. व्यसनमुक्ती कार्यक्रमांना प्रोत्साहन द्यावे. समाजहित आणि महसूल यामध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

भविष्यात उत्पादन शुल्क विभाग अधिक आधुनिक आणि सक्षम होणे गरजेचे आहे. पारदर्शकता, तंत्रज्ञान आणि कठोर अंमलबजावणी यांवर भर द्यावा. महसूल वाढीसोबत नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे. अवैध व्यवहारांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल. उत्पादन शुल्क विभाग अधिक विश्र्वासार्ह आणि परिणामकारक बनेल. हीच राज्य उत्पादन शुल्क विभागाची अपेक्षित दिशा ठरेल.

## रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांच्या समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करा - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई, दि. १६ : रायगड जिल्ह्यातील



आरसीएफ कंपनीच्या मरीन आउटफॉल लाईनमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी मंत्रालयात घेतला.

यावेळी आवश्यक चॅनेल व संरक्षण बंधारा उभारणी तसेच थळ–नवगाव परिसरातील मच्छीमार बांधवांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मौजे नवेदार–नवगाव येथील मत्स्य जेट्टी तसेच अलिबाग येथील रेवस–मांडवा प्रवासी जेट्टीच्या प्रलंबित विषयांचाही आढावा घेण्यात आला. या प्रकल्पांशी संबंधित विविध बाबींची सद्यस्थिती तपासून प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश मंत्री राणे यांनी दिले. स्थानिक मच्छीमार आणि नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याबाबतही मंत्री राणे यांनी सूचना केल्या.

बैठकीस आमदार महेंद्र दळवी, महाराष्ट्र सागरी मंडळ चे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप,महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले तसेच आरसीएफ कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## कोकणातील सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्य - मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई, दि. १६ : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मृद



व जलसंधारण विभागांतर्गत येणारे विविध लघु सिंचन प्रकल्प जलसंपदा विभागाच्या सुधारित मापदंडानुसार पूर्ण करण्यात येतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार कोकणातील सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात येत असल्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

मंत्रालयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागांतर्गत येणारे विविध लघु सिंचन योजनांचा आढावा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी घेतला. मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, व्यवस्थापकीय संचालक वि. म. देवराज, कार्यकारी अभियंता धनंजय साहुत्रे आदी यावेळी उपस्थित होते.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २३ लघू सिंचन प्रकल्पांना आवश्यक असलेली सुधारित प्रशासकीय मान्यता जलसंपदा विभागाच्या सुधारित मापदंडानुसार देण्यात येईल. या प्रकल्पांना आवश्यक असलेला निधी लवकरात लवकर देऊन प्रकल्प पूर्ण करण्यात येतील.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंजूर कामे निधी अभावी अपूर्ण आहेत. वैभववाडी तालुक्यातील ऐनारी, कणकवली तालुक्यातील शिरवल आणि कुंभवडे आदी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या सुधारित मापदंडानुसार निधी द्यावा, असे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

# झाशीची राणी लक्ष्मीबाई; तळपत्या सुर्याचा तेजोमय प्रकाश!

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन–दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे.झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी(वाराणसी )येथे १९नोव्हेंबर १८३५ ला झाला.



लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते.मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते. नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या.तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले. ब्रिटीश अधिकारी लिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि मी झाशी देणार नाही असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले.सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला.

परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे,बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले.यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०–३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ कोटा की सराय येथे येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला.अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा राजरत्न नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा सारंगी नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता.अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या. परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्दा राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला.परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले त्यामुळे दरवर्षी १८ जूनला पुण्यतिथी साजरी करण्यात येते. जोपर्यंत सुर्य–चंद्र, आकाश –पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या ह्दयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी.कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत,फुलात,फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल.राणी लक्ष्मीबाईना माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार;प्रभाग क्र. ३ मध्ये मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

लातूर प्रतिनिधी: विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील संत गोरोबा सोसायटी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १५ ची सुरुवात करण्यात आली आहे.



राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात येत आहेत. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून शहरी भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन

प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ८३ महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना शिलाईच्या शिवणकामातील विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रभागचे नगरसेवक विकास कांबळे सोशल मीडिया प्रमुख प्रवीण सूर्यवंशी, ट्रेनर प्रेमा ठाकूर, संस्थेचे समन्वयक गजानन बोयणे सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि प्रभागातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## रायगड जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत - पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई, दि. १६ : रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील दासगाव – वहुर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत दोन ऐवजी तीन पाण्याच्या टाक्या बांधण्यात याव्यात. तसेच जल जीवन मिशन योजनेअंतर्गत येणाऱ्या पाणीपुरवठा योजनानांची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

जलजीवन मिशन अंतर्गत महाड व माणगाव तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेची आढावा बैठक पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षखाली झाली. रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार



महेंद्र दळवी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन – नैनुटीया, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता मोहन सरावदे, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिक्षण व वित्त सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जिल्हा परिषद रायगड यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत व नळ पाणीपुरवठा योजना अंतर्गत किती नळ जोडणी बाकी आहे याचा आढावा घेऊन त्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव द्यावा व त्यातून नळ पाणी पुरवठा योजनेची नळ जोडणी पूर्ण करून घ्यावी. रायगड जिल्ह्यामध्ये ज्या मंजूर योजना आहेत त्यामध्ये काही त्रुटी आहेत त्या त्रुटी पूर्ण करून सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन योजना पूर्ण कराव्यात, असे निर्देश मंत्री पाटील यांनी दिले. यावेळी दाभोळ व टोळा (बु), दासगाव – वहुर, खैरे व २१ गावे, पोलादपूर व १४ योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धे दरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे पाच वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### अभ्यासा ..

करा कारण मिमांसा
स्विकारता अपयशा
अ संख्य गुप्त कंगोरे
शांत चित्ताने तपासा
कसे यशस्वीझाले ते
यशही नीट अभ्यासा
का फसवलेस बाबा
प्रश्र्न विचार आभासा
दिसत नसे स्पष्टपणे
तडे अंतर्गत विश्र्वासां
कुणीदिला दगा बघा
गुप्तहेरांवर आश्र्वासा
वाढो अंतर्गत कलह
काहींचा हाचं रे पेशा
फाटाफूट घात करते
जागा न ठेवावी द्वेषा
मुळीचं नाही तृप्तता
भूक अधिकअधाशा
पाय खेचतात मागेचं
चाले नाटक तमाशा
कुठेकसे पोहोचायचे
सुस्पष्टअसो नकाशा
उलटी पावले चालले
टाळा संभ्रम नकोशा
साध्य होईलं इप्सित
जागृत ठेवा जिगीषा
विजयश्री स्वता भेटे
मनात हवी चिकीर्षा

### आपण ..

हाता बाहेर स्थिती
अनन्वित प्रदूषण
जबाबदार तिसरा
एक दुजा दे दूषण
धुमधडाके फटाके
साजरे प्रत्येक सण
डेसिबल चिंता नसे
डिजे हवे क्षणोक्षण
वाहनांचा गदारोळ
हवे फक्त धुळीकण
इंधनभाव गगनाला
जाळतोयं तरी पण
हिलस्टेशन फुल्ल रे
फिरतशोधे वणवण
आऊटिंग प्रियभारी
रहदारीत हरेक जण
परिवारात तीन जण
फोरबीएचके घे पण
गगन झोंबी इमारती
सूर्याझाकतो आपण
प्रगतीच्या गतिपोटी
जंगले केली अर्पण
हाय फाय जगायला
मुक्त श्र्वास समर्पण
शोधायला स्वःताला
मिळणारं कुठे दर्पण
दोष आपले सांगाया
होतो कशाले कृपण

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६**

# उद्धव ठाकरेंच्या शिवबंधनात बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची ताकद उरलेली नाही भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा प्रहार

मुंबई : उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांच्या शिवबंधनात वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची ताकद उरलेली नाही. आणाभाका देऊन वा शिवबंधन बांधून आमदार, खासदार टिकत नाहीत तर त्यासाठी प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचे बंधन लागते. दुर्दैवाने उद्धव ठाकरेंकडे कार्यकर्त्यांबद्दल ना प्रेम उरले, ना माणुसकी उरली, ना आपुलकी. त्यामुळे उबाठा गटाचे आमदार, खासदार सातत्याने पक्ष सोडून प्रेम, आपुलकी आणि माणुसकीच्या बंधनात अडकण्याचा प्रयत्न करतात. आपल्या शपथा, शिवबंधनाला काहीही अर्थ नाही हे उद्धव ठाकरे, संजय राऊत यांनी लक्षात घेतले पाहिजे, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उद्धव ठाकरे लोकप्रिय आहेत आणि ते सर्वांना भेटतात, असे सांगणे हा या दशकातला सर्वात मोठा विनोद आहे. उद्धव ठाकरे हे आपल्या आमदार, खासदारांना मातोश्रीच्या दरवाजातून परत




पाठवतात. मुळात संजय राऊतांनाही अनेकदा मातोश्रीत प्रवेश मिळत नाही हे वास्तव आहे. हा विनोद कॉमेडी सर्कसमध्ये सांगितला तर प्रेक्षकांची हसून हसून पुरेवाट होईल, असे म्हणत श्री. बन पुढे म्हणाले की ज्यांना प्रत्येक गोष्ट पैशांत मोजायची, भ्रष्टाचार करायची सवय आहे. असेच लोक खरेदीविक्रीची भाषा करणार. मुळात खरेदीविक्री करण्याचा अनुभव संजय राऊत यांना जास्त असेल. कारण पत्राचाळीत मराठी माणसांना देशोधडीला लावून खरेदीविक्री कोणी केली याचे उत्तर एकदा संजय राऊत यांनी महाराष्ट्राला द्यावे.

संजय राऊत तुमच्या हातात ईडी, सीबीआय आणि न्यायालय दिले तरी तुमच्यासोबत एकही माणूस टिकणार नाही. नरेंद्र मोदीजी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांची सीबीआयकडून बारा – बारा तास चौकशी करण्यात आली होती. अमित शाह यांना तडीपार करण्यापर्यंत काँग्रेस सरकारची मजल गेली होती. परंतु ना अमित शाह यांनी भाजपा सोडली, ना नरेंद्र मोदीजींनी. आमचे प्रवीण दरेकर, प्रसाद लाड आणि देवेंद्रजी फडणवीस यांना अनेक खोट्या केसेसमध्ये अडकवण्याचा प्रयत्न तुम्ही केला. महाविकास आघाडीचे सरकार असताना तुम्ही अनेक आमदार, नगरसेवकांना फोडण्यासाठी प्रयत्न केले. पण तुम्ही साधा एकही नगरसेवकही फोडू शकला नाहीत. ईडी – सीबीआयचा गैरवापर करून माणसे तोडता येत नाही तर त्यासाठी तुम्हाला कार्यकर्त्यांना भेटावे लागते. बोलावे लागते, त्यांना संधी द्यावी लागते. त्यामुळे तुम्ही काँग्रेसच्या वाटेवर आला ते बघा, असेही श्री. बन यांनी नमूद केले .

विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने तुमच्या थोबाडीत मतरूपी जोडे मारले आहेत. महापालिकेच्या निवडणुकीत तुमच्या कानशिलात जोडे मारलेत. जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत तर भोपळा देऊन तुमच्या पक्षाला, तुमच्या पक्षप्रमुखाला आणि संजय राऊत तुम्हालाही लोकांनी मारले ते व्रण अजूनही पुसले गेलेले नाहीत. त्यामुळे जनतेचा असा अपमान करत असाल तर जनता तुम्हाला आणखी जोड्याने मारल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे जोड्याने मारण्याची भाषा तुम्हाला शोभत नाही, असे श्री. बन यांनी सुनावले.

अभिजीत दिपके यांना झालेल्या मारहाणीचे समर्थन होऊ शकत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. त्यांच्या आंदोलनाला विरोध असेल तर आंदोलनाच्या मार्गाने किंवा लोकशाही पद्धतीने त्याला प्रतिकार करता येतो. परंतु अशा पद्धतीने कोणाला मारहाण करण्याचे समर्थन भाजपा कधीही करत नाही, असेही श्री. बन यांनी स्पष्ट केले.

## सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात ‘शाळा प्रवेशोत्सव’ उत्साहात संपन्न; संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत

लातूर, दि. १५ : नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, शाळेबद्दल आत्मीयता वाढावी आणि प्रत्येक बालक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे, या उद्देशाने लातूर येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात ‘शाळा प्रवेशोत्सव’ मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, मुख्याध्यापक इस्माईल शेख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत इयत्ता पाचवीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय शिस्त, स्वच्छता, नियमित उपस्थिती, वाचन संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट यश संपादन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी बोलताना संस्था सचिव कालिदास माने म्हणाले, विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे ही शाळेची जबाबदारी आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, सर्जनशीलता आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवून शिक्षकांशी सातत्याने संवाद साधावा. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन, शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या प्रवेशोत्सवामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी आणि प्रेरणादायी ठरली.

## लातूरात हॉटेल मालवणी किचनचा माजी आ.शिवाजीराव पाटील

लातूर : लातूर शहरातील खाडगाव रिंग रोड परिसरामध्ये प्रो.प्रा.रविंद्र कांबळे यांच्या संकल्पनेतून हॉटेल अजिंठा नंतर हॉटेल मालवणी किचन अँड फॅमिली रेस्टॉरंटचा शुभारंभ भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या अध्यक्षतेखाली व औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या शुभहस्ते १७ जून २०२६ रोजी सायंकाळी ०७.०० वा. करण्यात येणार आहे.



हॉटेल मालवणी किचन अँड फॅमिली रेस्टॉरंटच्या शुभारंभ कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लातूर महानगरपालिकेच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपाचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, पुणे येथील उद्योजक सुनिल गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस संजय शेटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, लातूर महानगरपालिका स्थायी समितीच्या सदस्या तथा नगरसेविका आदितीताई पाटील कव्हेकर, भाजपा नगरसेवक गोटू यादव, पिंटू साळुंके, योगेश स्वामी, भाजपा नगरसेविका रागिणीताई यादव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

त्यामुळे मराठवाड्यामध्ये पहिल्यांदाच कोकणच्या स्वादिष्ट चवीची मेजवाणी देणार्या मालवणी किचन अँड फॅमिली रेस्टॉरंट शुभारंभ कार्यक्रमाला लातूर जिल्ह्यातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रो.प्रा.रविंद्र कांबळे यांनी केलेले आहे.

## १८ जुलै व २१ नोव्हेंबरला विशेष लोक अदालतीचे आयोजन

लातूर, (जिमाका): राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशान्वये लातूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १८ जुलै २०२६ आणि २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार दाखल असलेल्या ’चेक बाऊन्स’ (धनादेश अनादरीत) प्रकरणांसाठी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या पक्षकारांची तसेच बँक व वित्तीय संस्थांची या कलमानुसारची प्रकरणे सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या सर्वांनी या विशेष लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

या विशेष लोक अदालतीमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी समान संधी मिळते आणि दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड आपसी संमतीनेच केली जाते. न्यायालयात वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रियेला फाटा देत, येथे एकाच दिवशी आपसी संमतीने प्रकरण निकाली निघत असल्याने पक्षकारांचा मौल्यवान वेळ व पैसा वाचतो, तसेच प्रकरण निकाली निघाल्यावर भरलेले न्यायालयीन शुल्क देखील नियमानुसार परत मिळते. त्यामुळे सर्व संबंधित पक्षकार आणि विधीज्ञांनी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणावर आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## काटगाव येथे ’शाळा प्रवेशोत्सव’ उत्साहात; जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत

लातूर, (जिमाका) : राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवात रूपांतरित करणे, या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा ’शाळा प्रवेशोत्सव’चा लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.



लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, प्राथमिकच्या उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी, लातूरचे गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. याच पार्श्र्वभूमीवर काटगाव येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन अत्यंत आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेचे पर्यावरण अधिक समृद्ध आणि हिरवेगार व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, हा यामागील उद्देश होता. शाळेतील विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपण करून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने राज्यभर हा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना देण्याची ’पहिले पाऊल’ ही अभिनव संकल्पनाही राबविली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात काटगाव येथील शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री. मांदळे, केंद्रप्रमुख वामन राठोड, शिक्षक विजय माळाळे, गोविंद गारकर आणि श्रीमती राजमाले, श्रीमती तांदळे, श्रीमती खंडागळे, श्रीमती लांडगे, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती सय्यद उपस्थित होत्या.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी

आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देवून त्यांचे भवितव्य उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देवून या अनुषंगाने शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात : गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

लातूर : जेएसपीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून प्रवेश उत्सव २०२६ उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषपूर्ण स्वागत करत नवीन शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात करण्यात आली. प्रवेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच चॉकलेटचे वितरण करून विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर आनंद फुलविण्यात आला. नवीन विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्या दिवसाच्या आठवणी कायमस्वरूपी जतन करण्यासाठी त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षणाचा विषय ठरला.



यावेळी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. जुन्या विद्यार्थ्यांनी नवीन विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. नवीन शैक्षणिक वर्ष म्हणजे नव्या संधी, नवी ध्येये आणि ज्ञान, संस्कार व गुणवत्तेच्या दिशेने नवी वाटचाल असल्याचा संदेश प्राचार्य गोविंद शिंदे यांनी आपल्या मनोगतातून दिला.

प्रवेश उत्सवाला विद्यार्थ्यांची तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या चेहर्यावरील आनंद, पालकांचा विश्र्वास आणि शिक्षकांचा उत्साह यामुळे संपूर्ण विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, उपमुख्याध्यापक गणेश कदम, मुख्याध्यापक बाळाराम पिचारे, उपमुख्याध्यापिका अलका अंकुशे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक प्रतिनिधी राजकुमार साखरे यांच्यासह अनेक पालक प्रतिनिधी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीवर आता कडक निर्बंध

नवी दिल्ली, दि. १६ : केंद्र सरकारने देशभरातील औषध विक्रीच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीसाठी उपलब्ध असलेली विशेष सवलत रद्द केली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने औषधे नियम,१९४५ मध्ये सुधारणा करून हा निर्णय लागू केला आहे. आरोग्य मंत्रालयाने २९ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार अनुसूची ‘के’ मधील नोंद क्रमांक १३(७) मध्ये बदल करण्यात आला असून, त्यातून ‘सिरप’ हा शब्द वगळण्यात आला आहे.

यापूर्वी १,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये परवानाधारक औषधविक्रेता उपलब्ध नसल्यास काही अटींवर कफ सिरप विक्रीस सवलत होती. नव्या सुधारणेमुळे ही सवलत रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे आता देशातील सर्व गावांमध्ये कफ सिरपची विक्री आणि वितरण औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा, १९४० तसेच संबंधित नियमांचे पालन करूनच करावे लागणार आहे. यासाठी परवानाधारक औषधविक्रेत्यामार्फतच औषधांची विक्री करणे बंधनकारक राहील.

कफ सिरपच्या वापरावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे, संभाव्य गैरवापराला आळा घालणे आणि सार्वजनिक आरोग्य व सुरक्षेला बळकटी देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. तसेच औषध उत्पादक, वितरक आणि किरकोळ विक्रेत्यांनी संबंधित कायदे व नियमांचे काटेकोर पालन करावे, असे निर्देशही मंत्रालयाने दिले आहेत.

# ममता बॅनर्जींच्या 'हुकूमशाही'चा अंत-हेमंत पाटील तृणमूलच्या २० खासदारांचा एनडीएला पाठिंबा

पुणे, : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कणखर नेतृत्व आणि त्यांच्या विकासोन्मुख ध्येयधोरणांवरील विश्र्वासामुळेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीची (एनडीए) शक्ती वाढत आहे. देशातील 'हिटलशाही' तसेच 'परिवारवादी' संधीसाधू प्रादेशिक पक्षांचा त्यामुळे अंत होतोय, असे प्रतिपादन भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी सोमवारी (ता.१५) केले.

तृणमूल कॉंग्रेसच्या २८ पैकी तब्बल २० बंडखोर खासदारांनी धाडसी निर्णय घेत नेशनलिस्ट सिटिजन्स पार्टी ऑफ इंडिया' (एनसीपीआय) मध्ये विलीनीकरण करत, भाजपप्रणित एनडीएला पाठिंबा देण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला. बंडखोर गटाच्या नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी विलीनीकरणाचे पत्र लोकसभा अध्यक्षांकडे सादर केले आहे. ममता बॅनर्जींच्या 'हिटलर'शाहीचा आणि तृणमूलमधील परिवारवादाचा हा स्पष्ट अंत आहे. कोणत्याही ठोस विचारधारेवर आधारित नसलेल्या राजकीय पक्षाची सत्ता जाताच काय गत होऊ शकते; याचे तृणमूल हे एक जिवंत उदाहरण आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

या घडामोडीमुळे केंद्रातील मोदी सरकार आता आणखी भक्कम बहुमतासह आणि नव्या उत्साहाने कार्य करेल. एनसीपीआय मध्ये विलीन झालेल्या या २० खासदारांच्या निर्णयामुळे संसदेत भाजपची ताकद वाढली असून, आगामी काळात पश्र्चिम बंगालच्या राजकारणात याचे मोठे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. लवकरच होवू घातलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात या गटाला एक मंत्रीपद मिळण्याची शक्यता देखील पाटील यांनी वर्तवली.

विशेष म्हणजे टीएमसी खासदारांच्या पाठिंब्यामुळे केंद्रातील एनडीएचे संख्याबळ आता ३०० च्या पार गेले आहे. यामुळे आगामी संसदेच्या अधिवेशनात देशाच्या हिताची आणि विकासाची महत्त्वाची घटनादुरुस्ती विधेयके कोणत्याही अडथळ्याविना मंजूर करण्याचा मार्ग मोकळा झाला असून मोदी सरकार अधिक गतिमान होईल, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.

# महात्मा बसवेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयाची एमएचटी-सीईटी (पी.सी.बी./पी.सी.एम.) परीक्षा २०२६ मध्ये उज्ज्वल यशाची परंपरा कायम

लातूर दि.१७ जून : महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने एमएचटी-सीईटी (पी.सी.बी./पी.सी.एम.) परीक्षा २०२६ मध्ये उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

एमएचटी-सीईटी (पी.सी.बी.) मध्ये एकूण १७ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे यामध्ये शिंदे प्रथमेश रघुनाथ (९९.९७ परसेंटाइल), नवटाके स्वरांजली संतोष (९९.११ परसेंटाइल), हनवते आस्था भारत (९२.१० परसेंटाइल), उटगे सुरज प्रशांत (८८.२२ परसेंटाइल), तांबोळी दानिश समद (८७.६० परसेंटाइल), गिरी ऋतुजा संजय (८५.६८ परसेंटाइल), मुळे साक्षी राजेसाहेब (८३.३४ परसेंटाइल), गडदे श्रुती प्रभाकर (८२.८५ परसेंटाइल), सोमवंशी रूपाली दिगंबर (८२.१२ परसेंटाइल), ताशेवाले अफीफा सत्तार (८०.६९ परसेंटाइल), बुक्तार सांची संतोष (८०.६९ परसेंटाइल), शेख मुदस्सिर सलीम (७६.२६ परसेंटाइल), शेख शायमा कलीम (७६.१४ परसेंटाइल), मलिक अलीशा सलीम (७४.०४ परसेंटाइल), चलवाड नंदिनी विठ्ठल (७१.८४ परसेंटाइल), गताटे वीरेश शिवकुमार (७०.३९ परसेंटाइल) आणि चाकरे रूपाली बालाजी (७०.३७ परसेंटाइल) आदि गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

तसेच एमएचटी-सीईटी (पी.सी.एम.) मध्ये एकूण १४ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे यामध्ये ठाकूर दत्ता दिगंबर सिंग (९८.३४ परसेंटाइल), पाटील प्रथमेश आप्पाराव (९७.०८ परसेंटाइल), दीक्षित वरद वसंत (९५.४८ परसेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (९१.७९ परसेंटाइल), गौंड अभिजीत अण्णाराव (८९.५३ परसेंटाइल), माळी आदित्य गोपाल (८५.४७ परसेंटाइल), सय्यद ईशरत फिरोज (८३.८६ परसेंटाइल), चव्हाण पद्मावती रावसाहेब (८०.०३ परसेंटाइल), जमदरे अनिल संगमेश्र्वर (७७.७४ परसेंटाइल), डांगे राहुल शिवानंद (७६.८० परसेंटाइल), आडे अर्जुन विजय (७४.४२ परसेंटाइल), पांचाळ वरद प्रवीण (७२.९९ परसेंटाइल), कांबळे भूमी सतीश (७१.९१ परसेंटाइल) आणि सय्यद सकीना जमीर (७१.४९ परसेंटाइल) आदि गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार, सीईटी समन्वयक प्रा.सतीश माळी आणि प्रा.श्रीकांत माळी, बोर्ड समन्वयक प्रा.केशव सूर्यवंशी, प्रा.माधुरी सरपे, प्रा.पूजा घार, प्रा.पुनम शेळके, प्रा.शैलजा पाटील, प्रा.नीता दलगडे, प्रा.रोहिणी शेटकार, प्रा.मेघश्याम बोळेगावे, प्रा.यज्ञेश जनगावे, प्रा.खानापुरे हेमंत, बेडगे गणेश आणि शिक्षकेतर कर्मचारी आदिनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# वेदांत बंडगर हत्या प्रकरणी कुणाचीही गय नाही, आरोपींना मकोका लावणार - पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सांगली, - निष्पाप वेदांत बंडगरच्या हत्येची घटना गंभीर,



दुर्दैवी आणि धक्कादायक आहे. वेदांतच्या कुटुंबियांच्या दुःखात मी आणि राज्य शासन सहभागी आहोत. या प्रकरणात पीडितांना न्याय देण्यासाठी पालकमंत्री म्हणून पोलीस दल आणि प्रशासनाला कडक सूचना केल्या असून या गुन्ह्यात कुणाचीही गय केली जाणार नाही किंवा हस्तक्षेप वा दबाव खपवून घेतला जाणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

याबाबत पालकमंत्री कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे कि, आपण या प्रकरणाची माहिती घेतली असून घटना घडल्यापासून तपाससंदर्भातील हालचालींवर वेळोवेळी आपले बारकाईने लक्ष आहे. या दुर्दैवी घटनेबाबत मी व राज्य शासन अत्यंत संवेदनशील आहे. या प्रकरणातील प्रत्येक दोषी व्यक्तिला कायद्यापुढे उभे करण्यासाठी पोलीस यंत्रणेने पूर्ण क्षमतेने काम करण्याच्या सूचना दिल्या असून, पीडिताच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

पत्रकात म्हटले आहे कि, पोलिसांनी तपासात गती घेतली असून, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी निलेश गडदे व त्याचा साथीदार अतुल वायदंडे यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांना १८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. फिर्यादीत नमूद असलेल्या अन्य तीन आरोपींचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेला एकही आरोपी सुटणार नाही, ही शासनाची स्पष्ट भूमिका आहे. तपासातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे या गुन्ह्यामागील संपूर्ण साखळी उघडकीस आणण्यासाठी या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) चे कलम लागू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या थेट मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. फिर्यादीत नमूद इतर ३ आरोपींचा शोध सुरू आहे. या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर जत पोलीस ठाण्यात यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्याचीही गंभीर दखल घेण्यात आली आहे. संबंधित पोलीस निरीक्षकांचा प्राथमिक चौकशी अहवाल कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आला असून संबंधित पोलीस निरीक्षक यांना नियंत्रण कक्षास संलग्न करण्यात आले आहे.

या प्रकरणात कोणालाही अभय दिले जाणार नाही, कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही आणि कोणताही दोषी सुटणार नाही. तसेच कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. तपासात समोर येणारा कोणताही व्यक्ती कितीही प्रभावशाली अथवा कोणत्याही स्तरावरील असला तरी त्याला कायद्याच्या चौकटीत आणले जाईल. निष्पक्ष, पारदर्शक आणि वेगवान तपासाद्वारे पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# राज्यातील सहा आयटीआयमध्ये विशेष अभ्यासक्रम - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे बंदर क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ

मुंबई, दि. १६: सिंधुदुर्ग, नाशिक, पालघर, औंध-पुणे, नागपूर आणि मुंबई येथील निवडक सहा आयटीआय संस्थांमध्ये बंदरे क्षेत्राशी संबंधित विशेष अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक तयारी करण्यात यावी, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. विद्यमान आयटीआय इमारतींमध्येच विद्यार्थ्यांना हे शिक्षण दिले जाणार असून, अद्ययावत व उद्योगाभिमुख प्रशिक्षणामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील बंदरे क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने बंदरे विभागाशी निगडित आयटीआय कौशल्य विकास व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक अधिसूचना जारी करण्याबाबत मंत्रालयातील दालनात मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

निवडक आयटीआय संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन आवश्यक पायाभूत सुविधा तातडीने विकसित करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच सागरी व किनारी भागांमधील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन अभ्यासक्रमांची रचना करण्यावर विशेष भर देण्यात आला.

विशेषतः शिप बिल्डिंग, पोर्ट ऑपरेशन्स, लॉजिस्टिक्स, मरीन मेकॅनिक्स, कोस्टल मॅनेजमेंट आणि सागरी सुरक्षा यासारखे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. वाढवण बंदर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा विचार करून उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करण्याचे निर्देशही मंत्री राणे यांनी दिले. स्थानिक युवकांना प्राधान्याने प्रशिक्षण देऊन त्यांना बंदर क्षेत्रातील रोजगारासाठी सक्षम करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

बैठकीस महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.प्रदीप, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे अपर मुख्य सचिव, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सहसचिव विकास ढाकणे , कौशल्य विभागाचे सल्लागार चिन्मय शेटे व इंद्रराज राणे ,रूरल एनहान्सर्स ग्रुप चे मुख्य कार्यकारी अधिकारी अंबर आयडे, वॅग्न्स लार्निंग लिमिटेडचे उदय शेट्टी, अश्र्विन कासलीवाल तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# 'नीट-युजी २०२६' परीक्षा तयारीचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्याकडून आढावा

लातूर, दि. १६ : येत्या २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या 'नीट-युजी २०२६' या परीक्षेच्या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्याया बैठकीत परीक्षेच्या नियोजनबद्ध आणि पारदर्शक आयोजनासाठी संबंधित विभागांना सविस्तर सूचना देण्यात आल्या.




उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात एकूण २६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये लातूर येथील १९, अहमदपूर येथील २, उदगीर येथील २, निलंगा येथील २ आणि चाकूर तालुक्यातील चापोली येथील एका परीक्षा केंद्राचा समावेश आहे. या सर्व केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडावी आणि कोणताही गैरप्रकार होऊ नये, यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी 'ड्युटी मॅजिस्ट्रेट' आणि 'स्टेट ऑब्झर्वर' यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी नियंत्रण कक्ष

परीक्षेच्या दिवशी, म्हणजेच २१ जून २०२६ रोजी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक किंवा इतर कोणतीही अडचण आल्यास, तिचे तत्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ असा असून, विद्यार्थी व पालकांना गरजेच्या वेळी यावर संपर्क साधता येईल. तसेच परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि कोणत्याही आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीचा सामना करण्यासाठी विशेष वैद्यकीय पथके नियुक्ती करण्यात येणार आहेत.

# होलार समाजाच्या अभ्यासासाठी समिती गठीत करणार - मंत्री संजय शिरसाट

मुंबई, दि. १६ : होलार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल. या समितीच्या अहवालाच्या आधारे समाजाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.




मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली होलार समाजाच्या विविध प्रश्र्नाबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, दूरदृश्य प्रणालीद्वारे समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ - मुंडे, होलार समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, होलार समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी 'संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ' अंतर्गत होलार समाज आर्थिक विकास महामंडळ या स्वतंत्र उपकंपनीची स्थापना करण्यात आली आहे. यासाठी निधीची तरतूदही करण्यात आली आहे. समाजासाठी शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचाव्यात यासाठी विशेष परिपत्रक जारी करण्यात येणार आहे. हे परिपत्रक राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांना पाठविण्यात येणार असून त्याद्वारे संबंधित योजनांची माहिती समाजबांधवांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येईल.

मंत्री शिरसाट म्हणाले की, होलार समाजाच्या विविध मागण्या आणि प्रश्र्नांना न्याय देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. समाज प्रतिनिधींसोबत सातत्याने संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या जात आहेत.

# 'दिलखुलास' कार्यक्रमात कृषी उपसंचालक नामदेव परीट यांचे मार्गदर्शन यशस्वी खरीप हंगामासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक

मुंबई, दि. १६ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात कोल्हापूर जिल्ह्याचे कृषी उपसंचालक नामदेव परीट यांची 'खरीप हंगाम विशेष' मुलाखत प्रसारित होणार आहे. यामध्ये खरीप हंगामाची पूर्वतयारी, बदलत्या हवामानाच्या पार्श्र्वभूमीवर पीक नियोजन, प्रमाणित बियाण्यांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांविषयी ते सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरुवार, १८ जून आणि शुक्रवार, १९ जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन प्रसारित होणार आहे. तसेच हा कार्यक्रम 'न्यूज ऑन एआयआर' या पवरही ऐकता येणार आहे. ही मुलाखत कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांनी घेतली आहे. खरीप हंगामात अधिक उत्पादन आणि शाश्र्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी कोणत्या बाबींना प्राधान्य द्यावे, याबाबतही परीट मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रमुख पिकांच्या लागवडीवेळी घ्यावयाची काळजी आणि हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहितीही या मुलाखतीतून दिली जाणार आहे.

मुलाखतीमध्ये यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कोणत्या बाबींवर विशेष भर द्यावा तसेच हवामान बदलाच्या आव्हानांमध्ये शाश्र्वत शेतीसाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत श्री.परीट यांनी 'दिलखुलास' कार्यक्रमातून मार्गदर्शन केले आहे.

# अतिरिक्त प्लाझ्माचा प्रभावी वापर करून जीवनावश्यक औषधनिर्मितीचा प्रस्ताव तयार करा - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई, दि. १६ : राज्यातील रुग्णांना जीवनावश्यक औषधे व उपचार अधिक सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त उपलब्ध प्लाझ्माचा प्रभावी वापर करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विषयांवरील आढावा बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत राज्यातील रक्तपेढ्यांमधील अतिरिक्त प्लाझ्माच्या वापराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यात सध्या सुमारे ४५० रक्तपेढ्या कार्यरत असून त्यापैकी ७९ शासकीय क्षेत्रातील आहेत. उर्वरित रक्तपेढ्या खासगी व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जातात. शासकीय क्षेत्रात सुमारे २५ हजार लिटर अतिरिक्त प्लाझ्मा उपलब्ध असून खासगी क्षेत्रात हे प्रमाण तीन लाख लिटरपेक्षा अधिक असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या अतिरिक्त प्लाझ्माचा उपयोग करून हिमोफिलिया, थॅलेसेमिया तसेच इतर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आवश्यक औषधनिर्मितीची क्षमता विकसित करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना मुश्रीफ यांनी दिल्या.

याशिवाय वैद्यकीय शिक्षण विभागाच्या विविध योजनांचा आढावा, समित्यांच्या कार्यपद्धतीतील सुधारणा, आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनाची तयारी, गोंदिया येथील प्रकल्पांची प्रगती, वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतील मनुष्यबळाची उपलब्धता, दंत महाविद्यालय व सभागृह उद्घाटन कार्यक्रमांचे नियोजन तसेच विविध वैद्यकीय संस्थांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भातील विषयांवरही चर्चा करण्यात आली. बैठकीत मांडण्यात आलेल्या विविध प्रस्तावांवर सकारात्मक दृष्टीकोनातून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री मुश्रीफ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894